आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे
वर्ष ३० वे अंक अकरावा पृष्ठे १३ नोव्हेंबर २०२१ www.parlekar.com
Registered-RNI no. 54781/92

या अंकात

पान ०२ Diwali - Once upon a time
पान ०६ वाघांच्या आयुष्यावर बोलू काही - भाग १
पान ०९ ला पाझ
पान ११ 'स्पर्श-संवेदनेचं रहस्य'



पान ७
श्रीमती तेजस्विनी लेले

# दीपोज्योति: नमोस्तुते ... उत्सव प्रकाशाचा

दीपावली-- मनामनातील अंधार दूर करणारा, जीवनाला प्रकाशाची वाट दाखवणारा सण. दिव्यांची आरास, रांगोळीची सजावट, फराळाची लगबग आणि खमंग दरवळ, शालूशेल्यांची, रेशमी वस्त्रांची सळसळ, मोगरा, गुलाब, चंदन आदी देशी आणि विदेशी अत्तराचा घमघमाट घेऊन येणारा सण. पाहुण्यांची वर्दळ, मित्रमैत्रिणींच्या मैफली, पाडवा ,भाऊबीजेचे लाडिक हट्ट. गेले कित्येक वर्ष आपण दिवाळी अशीच साजरी करत आलो आहोत. गेल्या वर्षी मात्र करोनाने साऱ्यांच्या जीवावर संकट येऊन ठेपले आणि सारे सण-उत्सव, जत्रा-यात्रा, सर्व काही बंद झाले. देव सुद्धा बंधनात पडले तेथे मानवांची काय कथा ?

गेल्या वर्षी दिवाळीपर्यंत पहिल्या करोना लाटेचा जोर कमी झाला होता पण दुसऱ्याची भीती मना मनात ठाण मांडून बसली होती. मृत्यूच्या आपदेची सावली सर्वत्र पसरलेली होती त्यामुळे सण साजरा करायचा कुणालाही उत्साह नव्हता. ज्यांनी नियम धुडकावून साजरा केला



त्यातील अनेकांना त्याची किंमत संसर्गाच्या रूपाने मोजावी लागली.

पहिल्या व दुसऱ्या लाटेला कणखरपणे तोंड देऊन सध्या तरी आपण सुस्थितीत आहोत असे म्हणायला हरकत नाही. मोठ्या प्रमाणात झालेले लसीकरण आणि लोकांची स्वत:ला जपण्याची वाढलेली समज यांनी आत्तातरी करोनाला दूर ठेवत जनजीवन सामान्य होऊ बघत आहे. शाळांचे, कॉलेजचे दरवाजे सताड उघडले नसले तरी किलकिले नक्कीच झाले आहेत. अनेक कार्यालयांतूनही नोकरदारांना कधी पूर्णवेळ ,कधी अर्धा वेळ कामावर परतण्यास सांगितले जात आहे. लोकांची रोजंदारी पुन्हा सुरू झाली आहे. त्यामुळेच थोडी आनंदाची, सुखाची झुळुक आपण अनुभवू लागलो आहोत.

बाजार आणि ऑनलाइन अशा दोन्ही पर्यायांचा वापर करत लोकांची कपडे, फराळ आदी खरेदी सुरू झाली आहे. दिवाळीनिमित्त थोडे फिरण्याचे, थोडे नातलगांत, मित्र-मैत्रिणींत रमण्याचे संकल्प सुरु झाले आहेत. गेले दीड वर्ष सोसलेल्या वेदनांवर ही घातलेली हलकी फुंकरच आहे. ती खुल्या मनाने अनुभवूया. दिवाळीचा आनंद घेऊया. पुन्हा एकदा सर्वांच्या चेहऱ्यावर हसू फुलुदे. आनंद घ्या आनंद द्या. त्यासाठी दुर्बलांनाही थोडा प्रेमाचा हात पुढे करा. आणि मिळालेल्या सुंदर क्षणांचे त्यांनाही भागीदार करा.

अजूनही कोरोनाचे सावट पूर्ण गेले नाही. तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवली जात आहे पण जुलैपासून ती पुढे पुढे जात आता नोव्हेंबर उजाडला आहे. आपल्या संयमित वर्तनाने आणि मानसिक शिस्तीने ही शक्यता अशीच पुढे पुढे जात एक दिवस नाहीशी होऊ दे व साऱ्या जगाची या संकटातून सुटका होवो. दिपावलीचा दीप या अंध:काराला नाहीसा करो हीच 'आम्ही पार्लेकर'कडून सर्वांसाठी शुभकामना.






## संपादकीय

गेल्या वर्षीची दिवाळी एका अर्थाने भाकडचं गेली असल्याने आपण सर्व ह्या दिवाळीकडे मोठ्या आशेने बघत होतो. कोरोनच्या तिसऱ्या लाटेची भीती गेले दोन तीन महिन्यापासून वाटत होती, अनेक वैद्यकीय तज्ज्ञ तसे भाकीत वर्तवत होते. नशिबाने गेल्या दोन वर्षातील अनेक भाकितांप्रमाणे त्यांचे हेही भाकीत चुकले आणि कोरोनाच्या लाटेने त्यांना हुलकावणी दिल्याचे चित्र आज तरी आहे. मुंबईत आजमितीला रोज तीनशेच्या आसपास कोरोनाचे नवे रुग्ण मिळत असले तरी त्यातील फारच थोड्यांना हॉस्पिटलची गरज लागत आहे. ह्या पार्श्वभूमीवर ही दिवाळी तरी आनंदात जाईल अशी अपेक्षा करायला काहीच हरकत नाही.

सध्या पार्ल्याचे मार्केट गजबजून गेले आहे. कुठेही काटकसर न करता लोकही भरभरून खरेदी करत आहेत. कपड्यांच्या खरेदीबरोबरच फराळाचे जिन्नसही ऑर्डर केले जात आहेत. पावसाळा संपून नुकतीच थंडीला सुरवात होत आहे. गेली दोन वर्षे घरात अडकून पडल्याने आलेला कंटाळा घालवण्यासाठी अनेक जण सहलींच्या योजना आखत आहेत. शाळा, कॉलेजेस, सिने-नाट्य गृहे, हॉटेल्स, आस्ते आस्ते पूर्वपदावर येत आहेत. एकूण काय, लोक कोरोनापासून स्वत:चा बचाव करायला शिकले आहेत असेच म्हणावे लागेल.

नाही म्हणायला कोरोनासुद्धा जाता जाता आपल्याला चार गोष्टी शिकवून गेला. स्वत:च्या तब्येतीबाबत आपण जास्त जागरूक राहायला शिकलो. घरगुती जेवण, वेळच्यावेळी खाणे, नियमित व्यायाम, रस्त्यावर कमी वाहने असल्याने प्रदूषणमुक्त वातावरण, ह्या सर्वांचा सकारात्मक परिणाम आपल्या जीवनशैलीवर झाला आहे. संकटाच्या वेळी आपले कुटुंबीय हेच आपले सुरक्षा कवच असते हे आपल्याला नव्याने उमगले आहे. कठीण प्रसंगात एकमेकांना घट्ट धरून भक्कम आधार देण्याचे महत्व आपण जाणले आहे. कमीतकमी पैशात जास्तीतजास्त आनंदी, सुखी आणि समाधानी राहण्याची कला सुद्धा आपण आत्मसात केली आहे. उद्योग जगतात गेली काही वर्षे संगणकीकरण, डीजिटलायझेशन, यावर खूप चर्चा घडत होत्या पण प्रगती मात्र धीम्या गतीने होत होती. कोरोना महामारीमुळे लांब पल्ल्याचा प्रवासाचं नव्हे तर घरातून बाहेर पडणेही अशक्य झाले व ह्या प्रक्रियेला गती मिळाली. 'वर्क फ्रॉम होम' सारख्या नवीन संकल्पना प्रत्यक्षात आल्या व रुजल्या देखील. सर्वात महत्वाचे म्हणजे कुठल्याही परिस्थितीत डगमगून न जाता संघर्ष करण्याची हिम्मत आपल्याला ह्या महामारीनेच दिली.

लाखो वर्षे अपरिमित संकटांना तोंड देत तगून राहणाऱ्या मानवतेच्या आंतरिक शक्तीची ह्या महामारीच्या निमित्ताने आपल्याला नव्याने ओळख झाली. कोरोनाच्या काळ्याकुट्ट ढगावरील हीच ती रुपेरी कडा !

आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
पूर्वा कळंत्रे
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
रोहित जाधव
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# Diwali - Once upon a time

आमच्या वेळी असं असायचं, तसं असायचं ; अशी वाक्यं ऐकली की माझे कान टवकारले



जातात. मग विषय कुठलाही असो. दिवाळी तोंडावर आली आहे. दरवर्षी होणारा बदल, मग तो हवामानातला असो किंवा सभोवतालचा असो मला हा बदल माझ्या लहानपणीच्या आठवणी निघायला मदत करतो.

एक मध्यमवर्गीय कुटुंब. बाबा ऑफिसला जाणारे. आई, मी सातवीत असेपर्यंत गृहिणी. आमच्या बिल्डिंगमध्ये मराठी सोबत गुजराती, जैन, मद्रासी अशी मिक्स कुटुंब होती. पैकी गुजराती जास्त होती.

दिवाळीची सुट्टी सुरू झाली की सुरवात व्हायची ती घरच्या साफसफाईला. बाबा ऑफिसला गेले की आई सगळे पितळेचे डबे चिंच किंवा शिकेकाई लावून सोन्यासारखे लख्खं पिवळे धमक करत असे. आईने डबे घासून विसळले की आम्ही ते बाहेरच्या खोलीतल्या जुन्या चादरीवर वाळायला उपडे घालत असू. ते काम झालं की वेळ असला तर अल्युमिनियमचे डबे घासून लख्खं चांदी सारखे करत असे. या घासण्याच्या कामात आम्ही दोघी बहिणी सांगकाम्या बाळ्या होतो. पुढच्या दिवशी चकलीच्या भाजणीची तयारी व्हायची. एकीकडे आम्ही बाहेरची खोली आवरायला घ्यायचो. आमचा पुस्तकं वह्यांचा कप्पा आवरून ठेवणे, कपाटात कपडे नीट रचून ठेवणे ही कामं करत असू. आमच्या शेजारचं पटेल कुटुंबही साफसफाईला सुरवात करत असत. त्यांच्याकडे चकली ऐवजी घुगरा (करंजी) आणि शक्करपारा (शंकरपाळे) हे पदार्थ व्हायचेच व्हायचे.

आई दिवाळीला घरीच फराळ करत असे. आई चकलीची भाजणी जात्यावरच दळत असे. ती दळून झाली की बारीक चाळणीने चाळून स्वच्छ घासलेल्या डब्यात भरून ठेवत असे. जाळीवरच्या उरलेल्या जाडसर चाळाचे ती नंतर सुरेखसं थालीपीठ करायची. आम्हा सर्वांना चहा बरोबर तुकडा..तुकडाच मिळायचा पण तो तुकडा अतिशय खमंग लागायचा. यामुळे काहीही वाया जायचं नाही. भाजणी दळून झाली की त्यादिवशी एक वाटी भाजणीच्या चकल्या करून बघत असे. चकल्या पाडण्यासाठी तिला वर्तमानपत्राचे छोटे चौकोनी तुकडे आम्ही तिला कापून देत असू. पिठाला मीठ तिखट बरोबर झालंय ना हे बघण्याची जबाबदारी माझी असे. आई त्या लाकडी सोऱ्यात पिठाचा उंडा भरून जोर लावून चकल्या पाडत असे. हे सगळं झाल्यावर रात्री मुगाच्या डाळीची खिचडी आणि काकडीची कोशिंबीर असा सात्विक बेत असायचा. तेव्हा सर्रास हॉटेलमधून मागवण्याची सोय नसेच. फराळाचे सगळे प्रकार झाले की म्हणजे चिवडा, चकली, सांजोऱ्या, शंकरपाळे झाले की आम्ही फरशी धुण्यासाठी सोडा आणत असू. फरशीवर बदाबदा पाणी ओतून, सोडा सगळीकडे टाकून तारेच्या ब्रशने फरशी घासत असू. मनसोक्त फरशी घासून झाली की एका कॉटनच्या जुन्या फडक्याने ते सगळं पाणी बादलीत पिळून काढत असू. पुढचे काही दिवस फरशी फेयर अँड लवली लावून चमकणार नाही इतकी चमकत असे. ओलेत्या पावलाने फरशीवर भराभरा चाललं की चुक..चुक ..असा आवाज येत असे. तो आवाज म्हणजे फरशी स्वच्छ झाल्याचे प्रमाण होते.

एव्हाना बाबा त्यांच्या ऑफिसमधल्या एका शिपायाकडून फटाके घेत. तो शिपाई जोडधंदा म्हणून दिवाळीत फटाक्यांची ऑर्डर घेत असे.



फटाके आणले की सगळ्यात आधी त्यांचं समान वाटप व्हायचं. बाबा फार मोठ्या आवाजाचे सुतळी बॉम्ब किंवा लक्ष्मी बॉम्ब आणत नसत. लवंगी, अनार, फुलबाज्या, लाल रंगाच्या फटाक्यांची छोटी माळ , भुईचक्र आणि कधीतरी साप आणत. दुसऱ्या दिवशी सगळे फटाके उन्हात कडकडीत वाळवायला ठेवत असू. याने एकही फटाका फुसे होत नसे. असं फटाक्यांना ऊन दाखवल्यावर लवंगी फटाके आम्ही एकेक करत सोडवत असू. याचं कारण असं की दर दिवशी संध्याकाळी थोडे थोडे फटाके घेऊन , फटाके संपले की ताबडतोब घरी यायचं. कुठेही उंडारत बसायचं नाही अशी सक्त ताकीद आईकडून मिळालेली असायची. या दरम्यान आईची जोरदार हाक ऐकू आली की उरलेल्या फटक्यांची पिशवी पोटाशी धरून ..थांब अजून आजचे फटाके संपले नाहीयेत ते दाखवायला यायचो.

वसुबारसेपासून ठिपक्यांची रांगोळी काढायला सुरवात व्हायची. ठिपके काढायला एक पांढरा भोकं पाडलेला कागद आम्ही घरटी चारपाच जणी वापरत असू. रांगोळीच्या पुस्तकाचं पण तेच. माझ्या एका गुजराती मैत्रिणीकडे रांगोळीचं एक पुस्तक बिल्डींग मधल्या अनेकजणी रांगोळी काढायला घेत असू. आम्ही मैत्रिणी एकमेकींच्या घरी रांगोळी काढायला, त्यात रंग भरायला जात असू.

प्रत्यक्ष दिवाळीच्या पहिल्या दिवशी म्हणजे नरकचतुर्दशीला सकाळी लवकर उठून कोणाची

पान ३ वर



पान २ वरून

# Diwali - Once upon a time

अंघोळ सगळ्यात आधी होते याची चढाओढ लागत असे. आई पाटाखाली रांगोळी काढून त्यावर हळद कुंकू घालून आम्हाला तिच्या मऊ मऊ पण फराळ करून थकलेल्या हाताने सुंदर सुगंधी तेल लावत असे. हे तेल लावणं कधी संपूच नये असं वाटायचं. एकीकडे डोळ्यावर झोप असेच. बाहेर जोरदार फटाक्यांचे आवाज सुरु झाले की आमची झोप पुरती उडायची. आई शिकेकाईने केस चोळून द्यायची. सुगंधी उटणे दुधात भिजवून तेही पाठीला, मानेला चोळून द्यायची. कडकडीत गरम पाण्याने अंघोळ करून नवे कपडे घालेपर्यंत थंडीनं कुडकुडायला व्हायचं. हो..हो..त्याकाळी चांगलीच थंडी पडायची. हल्लीच्या मुलांचा यावर विश्वास बसत नाही.

नवे कपडे हे वर्षातून दोन वेळा मिळत असत. दिवाळी आणि वाढदिवस. दिवाळीला शक्य असले तर दोन जोड नव्या कपड्यांचे मिळायचे. चपलाही कधी कधी नव्या असत. सकाळी सगळं आटपून आम्ही सगळे एका ताटात फराळाचं केलेलं घेऊन त्या ताटाभोवती कोंडाळं करून बसत असू. गप्पागोष्टी आणि फराळ यात वेळ एरवीच कसं निघून जायचा ते कळत नसे. दिवाळी जर चार दिवस असली तर (नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज) फारच छान वाटायचं. सगळे घरी असायचो. नाहीतर अशी वेळ कधी यायची नाही. या सुट्टीच्या दरम्यान एकदा मावशीकडे गेलो असताना माझी मावसबहीण घरी नव्हती. मावशीनं ती किल्ला बघायला गेली आहे म्हणाली. आमच्या सोसायटीत बरेच जण गुजराती असल्यानं दिवाळीत किल्ला करतात हे माहीत नव्हतं. त्यांची खूप मोठी सोसायटी असल्यानं प्रत्येक बिल्डींगमधल्या मुलांनी किल्ला करायची स्पर्धा ठेवली होती. आम्हीही किल्ले बघायला कुतुहलाने गेलो. काय एकेकाने सुंदर किल्ले केले होते. एकाने प्रतापगड, रायगड आणि एकाने तोरण्यावरची बुधला माची केली होते. खेळातले मावळे, घोडे आणि सिहांसनावर बसलेले शिवाजी महाराज हे होतेच. शिवाय एका किल्ल्यावर खेळण्यातला कुत्राही ठेवला होता. खूपच मजा वाटली हे सगळं बघताना.

भाऊबीजेला तीन मामांपैकी एक जण गावाहून यायचा. तो ज्या मावशीकडे असेल तिथे सगळ्या मावश्या आणि आम्ही जमायचो. मामा फक्त फिरकी घ्यायलाच गावाहून येतो असं आम्हाला वाटायचं. आम्ही मावस भावंडं खूप धमाल करत असू. एकीकडे आपला भाऊ आला म्हणून आई आणि मावश्या आनंदात असायच्या. गावाहून आजीने सगळ्यांसाठी शेतातली ज्वारी, कळण्याचं पीठ, भुईमुगाच्या शेंगा, गुळ अशी भेट प्रत्येकाला पाठवलेली असायची. एका जुन्या फडक्यात हे सगळं सुतळीनं बांधलेलं असायचं. त्या फडक्याला एक विशिष्ठ वास यायचा. तोच आणि तसाच वास आजीला मिठी मारली की यायचा.

दिवाळीत पणत्यांमध्ये लावायला वाती वळायला आईला सहाण काढून दिली आणि आमच्या वेळची दिवाळी आठवली. मी या आठवणी आईला सांगणार तोच आईनं तिच्या लहानपणीची गोष्ट सांगायला सुरवात केली.

**मंजिरी वैद्य**
९७६९०६०४८४





## सर्व पार्लेकरांना दिवाळीच्या खूप शुभेच्छा

Sanjay Gajre 9867995509
Arti Gajre 7208666759

**Shree Sidhivinayak Enterprises**

**Agarbatti Dhup Stick Dhupvati**

**MANE'S**
Pure Organic Jaggery
Non Chemical

Exclusive Range of Ayurvedic Soaps

E-mail: gajre.sanjay@gmail.com

6/B. Thanawala Chawl, M.G.Road, Behind Jay Bhagwan Hall, Hariniwas Thane (W)

गणपती साठी दीपस्तंभ, दीपमाळ, आकर्षक सुगंधित अगरबत्ती धूप स्टिक.
ओज आयुर्वेदिक साबण. कोकम आयुर्वेदिक साबण व इतर बरेच काही

TOP 3 IN KONKAN

## READY POSSESSION | NO GST | COSMOPOLITAN CONSTRUCTION

### KUDAL
### ICON GREENS

8 Row Houses of 1020 Sqft each
28 Flats ( 1 & 2 BHK )
area ranging from 600 Sqft

Independent Parking | Metro City Construction Quality
24 Hours Water Supply | Spacious Rooms

At Bhairav Wadi, Behind Kudal Panchayat Samiti Office, Kudal, Dist. Sindhdurg

Mumbai - Goa Highway - 1 KM | Kudal Railway Station - 1.5 KM
Kudal Market - 0.5 KM | Chippi - Parule Airport - 24 KM

**Contact - 9604824720, 8605602260**




A Project by - Icon Realty, Mumbai

### SAWANTWADI
### SHREE SAI SERRENIA APARTMENT

1 & 2 BHK FLATS
Area ranging from
640 Sqft to 890 Sqft

Lift | Independent Parking | 24 Hours Water Supply
Spacious Rooms

Next to Khatavkar Hospital, Near Urdu School,
Off Mumbai - Goa Road,
5 mints walk from Sawantwadi Bus Depot,
Sawantwadi, Dist. Sindhudurg

**Contact - 9604824720, 9420457258**



A Project by - SVR Developers, Mumbai

### OPEN LAND IN SAWANTWADI

112 Gunthe
( Proposed NA )
Land available suitable for
Plotting & Housing Project.

Near Sawantwadi Railway Station,
Sawantwadi - Vengurla Road Front.

**Contact**
**9604824720, 9420457258**




* SPECIAL OFFERS & DISCOUNTS FOR GROUP BOOKINGS, INVESTORS & CORPORATE

# चविष्ट फराळाची दिवाळी

खाऊगल्ली

दसरा झाला की आपल्याला वेध लागतात ते दिवाळीचे. कुठलाही सण साजरा करायची पद्धत काळानुरूप बदलत जाते. जसं फारपूर्वी नवीन कपडे हे साधारणत: वाढदिवसाला किंवा सणासुदीला घेतले जायचे. कंदील घरीच बनवले जायचे. दिवाळीत आपल्याला सगळ्यात जास्त आकर्षण असतं ते म्हणजे फराळाचं. कारण फारपूर्वी ते सगळे फराळाचे पदार्थ फक्त दिवाळीच्या वेळेला घरीच केले जायचे. पण आता मात्र घरी करण्याबरोबर फराळ विकतही मिळतो. बऱ्याचश्या स्त्रिया आता नोकरी करतात. करियर , घर , आले गेले पाहुणे आणि शिवाय दिवाळीचा फराळ या सगळ्याच गोष्टी काही शक्य नाही. फराळाचे पदार्थ तसे करायला कठीण असतात आणि वर्षाकाठी एकदाच केल्यानी तितकासा आत्मविश्वास देखील नसतो.





सध्या बाजारात अनेक जणं केटरिंग किंवा फराळाच्या व्यवसायात उतरले आहेत. गेले १०-१२ वर्षांपासून केटरिंग आणि त्याबरोबरच दिवाळीचा फराळ याचा व्यवसाय करणाऱ्या लिला शिरगावकर. केटरिंग आणि दिवाळीचा फराळ हे त्यांनी एकत्रच सुरु केलं. त्यांचे कुटुंबीय त्यांना या व्यवसायात मदत करतात. फराळाचे सगळे पदार्थ म्हणजे लाडू , चकली , चिरोटे , शेव , करंजी , अनारसे , शंकरपाळे , चिवडा असे सगळेच चविष्ट फराळाचे पदार्थ त्या करतात . फराळाचे हे पदार्थ परदेशातही त्या पाठवतात. गेल्या वर्षी आपल्या सगळ्यांचीच दिवाळी फार काही खास गेली नाही. एकमेकांकडे जाणं फार कमी होतं. अश्यातही लिला ताईंना त्याच्या व्यवसायात फार फरक पडला नाही. लॉकडाऊन मधे लिला ताईंच्या शेजारच्यांच्या मदतीने त्यांनी २०० गोरगरिबांना तिन्ही वेळेचं जेवण पुरवलं. कोवीड काळात ही केलेली सेवाच आहे.

पार्टी ऑर्डरही त्या घेतात. सिझन प्रमाणे, सणांप्रमाणे त्या पदार्थ करतात. त्यांच्याकडे पुरणपोळी १२ ही महिने उपलब्ध आहे . मंडळी वाट कसली बघताय ? जे पदार्थ तुम्हाला घरी करणं सहज शक्य नसेल ते पदार्थ तुम्ही लिला ताईंकडून घेऊ शकता. चविष्ट फराळ खा आणि आनंदानी दिवाळी साजरी करा.



ग्रीष्मा बेहेरे
९९६९३९२५८८










**कुठल्याही माध्यम संस्थेचा संपादकीय विभाग हे एक अजब रसायन असते. कधी ‘डेडलाईन’चे टेन्शन, कधी एखाद्या सामाजिक विषयावर जोरदार चर्चा तर कधी ‘सेलिब्रिटी’ पाहुण्यांबरोबर दिलखुलास गप्पा. येथे सतत काही ना काही घडत असते. येत्या वर्षाअखेर ३० वर्षे पूर्ण करणाऱ्या ‘आम्ही पार्लेकर’चा संपादकीय विभागसुद्धा अशा अगणित घटनांचा साक्षीदार आहे. त्यातील काही निवडक किस्से थेट आमच्या संपादकीय विभागातून !**

आम्ही पार्लेकर ३०

२०१८ साली चित्रा वाघ हिच्यानंतर ’आम्ही पार्लेकर’ मध्ये सहसंपादिका म्हणून माझी वर्णी लागली. वाचनाची आवड असली तरीही खूप लिहिण्याचा सराव नव्हता. त्यामुळे खूपच दडपण आलं होतं आणि पहिल्याच महिन्यात काही कारणामुळे एकदम `Third Page' लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर आली. म्हणजे अंदाजे बारातेराशे शब्द. चित्रा, प्रज्ञा आणि अर्थातच चांदेकर सरांच्या मार्गदर्शनामुळे ते शक्य झालं. मग लिखाणाच्या बरोबरीनेच अंकाच्या इतर कामांसाठी कॉम्प्युटरशी संबंधित बाबींसाठीची मदत वेळोवेळी माझे सहकारी शशांक, कपिल, चंदना यांनी केली आणि मी हळूहळू ’आम्ही पार्लेकर’ मध्ये स्थिरावत गेले.

ह्या निमित्ताने पार्ल्यातील विविध क्षेत्रामधल्या कितीतरी लोकांना भेटण्याचा योग आला. अनेक संस्था, त्यांचे कार्यकर्ते यांची कामे, त्यांचे स्वभाव जवळून बघायला मिळाले. एखादा लेख मिळाल्यावर तो तपासून घेणं, जागेप्रमाणे तो एडिट करणं, विषयांनुरुप फोटोंची मांडणी करणं या प्रकारची तयारी, आयत्यावेळी घाई नको म्हणून कितीही आधीपासून केली तरीही शेवटच्या क्षणांपर्यंत येत असलेल्या बातम्यांमुळे, शेवटच्या दोन दिवसात मजकुराच्या योग्य मांडणीसंदर्भातली ती तारेवरची कसरत अपरिहार्य ठरायची.

अंक छापून पोस्टात टाकण्यापर्यंतचं वितरणाचं काम ऑफिसमधील टीमच्या अखत्यारीत असतं. त्यात आजतागायत कधीही दिरंगाई झाली नाही. परंतु पोस्टाच्या हातात गेल्यावर अंक ग्राहकांकडे कधी पोहोचेल याचा कंट्रोल टीमच्या हातात नसतो. महिन्याच्या ३/४ तारखेपासूनच फोन घणघणायला सुरुवात व्हायची. अंक केव्हा येणार ? आम्हाला मिळाला नाही, अमक्यांना मिळून दोन दिवस झाले, वगैरे वगैरे. वर्गणीदारांना आमची बाजू पटवून देऊनही नेहमीपेक्षा एखादा दिवस उलटून गेल्यावर ऑफिसमध्ये फोन वाजायचाच. काही प्रमाणात त्यांची गैरसोय होत असली तरीही वाचक आपल्या अंकाची किती आतुरतेने वाट बघताहेत हे बघून मनातून खूप बरंही वाटायचं.

गेली अनेक वर्ष लो. सेवा संघाच्या ग्राहक पेठेत ’आम्ही पार्लेकर’चा स्टॉल असायचा, जेणेकरून वाचकांना वर्गणी भरण्यासाठी अधिक सोयीचे होऊ शकेल. पार्लेकरांसोबतच पार्ल्याबाहेरील रहिवासीदेखील अंकाचे वर्गणीदार आहेत आणि त्यांनादेखील पार्ल्यावर आधारित पार्ल्याचा पेपर खुणावतो हे बघून आनंद वाटायचा. ’मुंबईतल्या एका छोट्याशा उपनगरातील एक मासिक जे प्रामुख्याने पार्ले परिसराशी निगडीत असूनदेखील इतकी वर्ष सातत्याने प्रकाशित होतेय हे निश्चितच कौतुकास्पद आहे’ अशी पोचपावती अनेकदा मिळायची.

मिडीया क्षेत्राच्या बरोबरीने रोजच्या जगण्यातदेखील डिजिटल माध्यमाचं वारं बऱ्यापैकी वाहायला लागल्यावर ’आम्ही पार्लेकर’ मधे सुद्धा बदल घडायला सुरुवात झाली. ऑनलाईन अंक, फेसबुक, व्हॉटअप, वेबसाईटवरून ’आम्ही पार्लेकर’ सातासमुद्रापार पोहोचायला लागला होताच. त्याच बरोबरीने छापील अंकाव्यतिरिक्त फेसबुकवर छोटेखानी मुलाखती आणि चर्चासत्र याचा ट्रेंडही सुरु केला गेला. छापील अंकाच्या बरोबरीने डिजिटल वाचकही ’आम्ही पार्लेकर’शी नातं जोडायला लागले. त्याच दरम्यान मार्च २०२० पासून कोविडने जनजीवन ठप्प केलं असलं तरीही ’आम्ही पार्लेकर’ चा अंक एकही महिना न चुकवत ऑनलाईन माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचला. अंकाच्या इतर सदरांच्या बरोबरीने कोविड काळात नागरिकांना जाणवणाऱ्या समस्या, त्याविषयीची माहिती, अपडेट्स, अनेक संस्था करत असलेली मदत या विषयीची माहिती पार्लेकरांना डिजिटल अंकाच्या आणि सोशल मिडीयाच्या माध्यमातून वेळोवेळी दिली गेली. टीव्ही आणि इतर मिडियावरून राष्ट्रीय आणि मुंबई पातळीवरील अपडेट्स सर्वांना मिळत असले तरीही आपल्या जवळच्या परिसरात डॉक्टर्स, कोविड सेंटर्स, लसीकरण या सुविधा कुठे मिळतील या संदर्भातील माहिती जास्त महत्वाची असते. ’आम्ही पार्लेकर’तर्फे पार्ल्यातील कार्यरत असलेल्या सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी, डॉक्टर्स, बीएमसी अधिकारी, पोलिस अधिकारी यांच्या मुलाखती घेतल्या गेल्या, चर्चासत्रे आयोजित करण्यात आली आणि त्यामार्फत पार्लेकर नागरिक आणि प्रशासकीय संघटना यांच्यात दुवा बनण्याचे काम करता आले.

वार्षिक अंकाचा विषय, त्याचं मुखपृष्ठ, त्यातील विभाग, त्यासाठीचे लेखक आणि प्रत्यक्ष कार्यक्रमाची तयारी करणं हा कालावधी इतर महिन्यांपेक्षा थोडा जास्त उत्साहात पार पडतो. वार्षिक अंकाच्या निमित्ताने पार्ल्याबाहेरील लेखक आणि वेगळे विषय हाताळायची संधी मिळाली. या कालावधीत अनेक चांगले मित्र जोडता आले. अनेक उत्तम व्यक्तींशी जवळून ओळख झाली. विचारांना चालना मिळाली. नव्या वाटा धुंडाळताना अनुभवसंपन्न होता आले.

अडीच तीन वर्षाच्या या छोट्याशा काळात मला ज्ञान आणि अनुभव देणारा हा ’आम्ही पार्लेकर’चा छोटेखानी प्रवास अनेक दृष्टींनी आणि अर्थांनी माझे आयुष्य समृद्ध करुन गेला. हे माझ्या जीवनातले एक अविस्मरणीय पर्व होते हे नक्की.

**भाग्यश्री महाजन**
९७६९२७५१६९

DIKSHA ENTERPRISES

Mobile
9867010525
9819564387

Wagle Estate Thane - 06
Website : www.sam-india.in




Back Massager Cushion

Back Massager massages the muscles to relieve tension & stress after a long tiring day. It has a handheld controller for changing direction of massage. You can easily keep the massager on a long chair and massage your back conveniently anytime & anywhere. It also has heating option in it as heat is good for our body and it relieves pain. This is a Multi use product for Upper back, Lower back, Neck, Leg, Arm, Palm, etc. This Back Massager can be used in car or while at home or office. It comes with car charger as well as an electric charger.

Magic Massager







Neck / Back Massager

Neck/Back Massager eases out pain from various parts of the body thus giving you a relaxing effect. Regular massage helps to eliminate fatigue thus relieving excess work pressure & also helps improve blood circulation in the body. Can be Used at Home/Office/ Car. Kneading Massage on Neck, Shoulders & Back with Rollers & Heat, Rollers can move clockwise and Anti-Clockwise. Adjustable strap secures the cushion to your favorite chair. Better and more durable than other massage pillows / cushions on the market.

Height Adjustable Folding Table



Free Home Delivery. All over Mumbai
Deal in All Massager, Relax Chair / Folding Table.

# वाघांच्या आयुष्यावर बोलू काही - भाग १

आसपास

वाघांसाठी प्रसिद्ध असलेल्या ताडोबा जंगलातील एक रम्य संध्याकाळ! संध्याकाळचा मंद वारा सुखावत होता. पलीकडील डोंगरापाठी सूर्य 'अस्तास जाण्याच्या तयारीत होता. आकाश लाल-तांबूस रंगाच्या अनेक रंगछटांनी रंगले होते. जितका मनमोहक सूर्यास्त दिसत होता त्यापेक्षा कितीतरी पटीत एका निसर्गाच्या रंगमंचावरील नाट्याचा तो प्रवेश दिलखेचक दृश्य आम्ही अनिमिष नेत्रांनी पाहत, अनुभवत होतो.

झाडांच्या झुडपाआडून एक वाघीण डौलदार चालीने पुढे आली. पुढचे पाय लांब करून आणि



शरीर ताणून तिने आळस दिला. उन्हाळ्यातील तळपत्या उन्हाचा ताप हलका होण्यासाठी एका झाडाच्या गर्द सावलीत आराम करत तिने दुपार घालविली होती. तिची झोप अतिशय सावध होती आणि पडल्यापडल्या अनेक वेळा मान उंचावून पलीकडेच बांबूच्या दाट बेटात झोपलेल्या पिल्लांवर नजर ठेऊन होती. आता झोप झाली होती. पोटापाण्याची व्यवस्था लावायची होती. जंगलात प्राण्यांना कुठलीही गोष्ट सहजासहजी मिळत नाही. ५-६ महिने मोठी असलेल्या तीन पिल्लांसाठी शिकार करणे अत्यावश्यक होते.

वाघिणीने स्वत:ला चाटून-पुसून स्वच्छ केले आणि हळूच आपल्या पिल्लाना उठवले. त्यांनाही अतिशय प्रेमाने स्वच्छ केले. तोंडावर तोंड घासून थोडे लाड केले. त्यांना हळू-हळू एका जंगल वाटेवरून गाडी रस्त्यावर घेऊन आली. तिथे कडेलाच तिने बसकण मारली आणि ७-१० मिनिटे पिल्लाना खेळू दिले. या वेळात अतिशय बारकाईने त्यांच्या हालचाली न्याहाळत होती. वाघाच्या पिल्लाना दोन वर्षांपर्यंत पावलोपावली धोका असतो. अगदी जन्मदाता वाघही त्यांना मटकावायला टपला असतो. पिल्ले आता आळस झटकून आता पूर्ण जागी झाली आहेत याची खात्री पटल्यावर हळू हळू मुलांना घेऊन उजवीकडील दाट जंगलात शिरली. दुपारच्या झोपेनंतर आया अशाच नाही का आपल्या मुलांना उठवून वेणी-फणी करून खेळायला घेऊन जातात? मानवाची असो अथवा वाघाची, आईचे प्रेम सर्वव्यापी आहे.

आईपासून पिल्ले दूर झाल्यावर कामदेव शरसंधान करू लागतो. माजावर आलेली वाघीण विशिष्ठ प्रकारची गर्जना करून नरांना आमंत्रण देते. मादीच्या आवाजाच्या दिशेने



कधीकधी दोन वाघ आले कि युद्ध अटळ. कधीकधी प्राणांतिकही! वाघ-वाघिणीचा प्रणय आठवडाभर चालतो. या काळात दोघेही फार हिंस्र बनतात. मादीवर आपला पराक्रम ठसविण्यासाठी काही वेळा भूक नसताना देखील, प्रणयात व्यत्यय आणणाऱ्या प्राण्याची शिकार करतात. वाघांचा प्रणय अतिशय धसमुसळा असतो. गुरगुरणे, बोचकारणे, चावे घेणे असे करत-करत अनेक वेळा संग होतो. प्रणयातील आग कमी झाल्यावर



बहुदा नर-मादी वेगळे होतात. वाघिणीला आता आई बनण्याची चाहूल लागते.

९५-१०५ दिवसांचा गरोदरपणाचा काळ संपल्यावर मादी २-४ पिल्लाना जन्म देते. मुलांचे डोळे जन्मत: बंद असतात आणि अशावेळी त्यांची खूप काळजी घेणे आवश्यक असते. एखाद्या गुहेत, दुर्गम जागी मादी पिल्लांचे संगोपन करते. अनेक धोके पावलापावलावर असतात वाघ, बिबळे, तरसं, जंगली कुत्रे, ससाणे असे अनेक शत्रू टपून बसलेले असतात. जरासुध्दा शंका आली आई मुलांना दुसऱ्या सुरक्षित स्थळी हलवते. प्रथम दूध, मग हळू हळू अर्धवट पचलेले मांस, नंतर शिकारीतील कोवळे अवयव आणि मग मांसाहार अशा क्रमाने आई हळू हळू पिल्लाना खायला शिकवते. साधारण ७-८ महिन्यांची मुले गवतात लपून आईला शिकार करताना पाहतात. आपापसात लुटुपुटुची लढाई करून सावजाला कसे पकडावे हे शिकतात. मग आई त्यांना शिकारीचे शास्त्रोक्त धडे देते. लपत-छपत सावजाच्या जवळ जाणे, चरणाऱ्या अनेक प्राण्यातून आपले सावज टिपणे, एकाग्रतेने त्याच्या हालचाली टिपणे, सावजाच्या गाफील क्षणाची वाट पाहून अचानक प्राणघातक हल्ला करणे, सफाईने त्याची मान मोडणे किंवा श्वास नलिका तोंडाने याचा वस्तुपाठ ती घालून देते. आईला मदत करणारी पिल्ले मग हळूहळू एकट्याने प्रथम छोटे आणि मग मोठे प्राणी मारू लागतात. साधारण दोन वर्ष तालमीत तयार झालेली पिल्ले आता एकटी भरकटू लागतात. आता त्यांना जंगल खुणावू लागते. स्वत:च्या पायावर उभे राहायची आस लागते.मग एखाद्या दिवशी आपले नशीब अजमावण्यासाठी, आपली हद्द मिळविण्यासाठी आणि आपला जोडीदार मिळवण्यासाठी निघून जातात ते न परतण्यासाठी.



संजय देवस्थळी
९८३३८६६४६२

HOME CARE SOLUTION PERFECT HOUSEKEEPING SERVICE

Deal with best service

We are giving

PEST CONTROL, SANITIZATION, HOME/OFFICE DEEP CLEANING, TAKING HOUSEKEEPING CONTRACT, SECURITY SERVICES, BIRD NETTING, SOFA/CARPET/CHAIRS CLEANING & SHAMPOOING, CAR SANITIZATION, CAR WASHING, WATER TANK CLEANING, WITH THE HELP OF TRAINING AND PROFESSIONAL STAFF.

PLEASE CONTACT :-
Ms. snehal / Ms. Pooja / Mr. Sunil
9224272537 / 9930700148 / 9136128360 / 9869428560 / 8879601587
E mail :-
perfect_services21@rediffmail.com
snehsun@gmail.com

MAAN MANTHAAN
Hypnotherapy Clinic

- Sleep Disturbance
- De Addiction
- Loss of Interest
- Obsessive Compulsive Disorder (OCD)
- Insomnia ( Sleeplessness )
- Behavior and thought Problems
- Suicidal Thoughts
- Family Problems
- Loneliness
- Concentration Problem
- Low Confidence
- Social Media / Mobile games-De Addiction
- Adolescent Problem
- Marital Problem
- Schizophrenia
- Stress
- Depression
- Inferiority Complex



Hypnotheray treatment and Counseling Sessions

Sepcially for Students

Special Sessions for Behavioural Issues
( Brain Gym, Meditation, Yoga, Shlokas )

- ADHD
- Improve Concentration
- Time Management
- Effective Study Techniques
- Improve decision making power
- Remove exam phobia and Exam Tention
- Goal Setting
- Exercisers to boost brain power

HYPNOTIST UMESHH SANE
9152017170 / 9136170017 - Vile Parle

गुरुकुल

# The show must go on...

सुप्रसिद्ध नृत्यांगना, नृत्य शिक्षिका श्रीमती तेजस्विनी लेले यांना पार्लेकर, कौतुकाने.. आदराने तेजुताई म्हणून ओळखतात. त्या



मूळच्या दहिसरच्या. आई श्रीमती विद्या शेवडे मूळ झाशीच्या. स्वत: संगीत शिकल्या होत्या. वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी संगीतातील मास्टर्स डिग्री संपादन केली. तेजुताईंच्या कार्यक्रमांसाठी गायन करत असत. वडील श्री. कमलाकर शेवडे मूळचे कर्नाटक येथील. तबला शिकले होते. आई वडील दोघांनाही कलेचा ओढा होता. त्यांच्या घरी अनेकदा छोट्या-छोट्या मैफिली होत असत. विलेपार्ले हे शहर सांस्कृतिक दृष्ट्या प्रसिद्ध असल्याने मुलांवर तसे संस्कार होण्याच्या दृष्टीने या दम्पतिने विलेपार्ले येथे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. पंडित वेणुगोपाल पिल्लई यांच्या हाती विद्याताईंनी.. अम्माजींनी आपली लेक सोपवली आणि वयाच्या पाचव्या वर्षी तेजुताईंचा नृत्य प्रवास सुरू झाला.

लोकेश, देवेश, तेजस्विनी ही तिन्ही भावंडं प्रायोगिक नाटकांमध्ये कामं करीत असत. छबिलदासला ही त्यांची खूप नाटकं व्हायची. तेजुताईचं काम पाहून त्यांना प्रायोगिक नाटकांसाठी ही विचारणा होऊ लागली. पण तेजुताईंना त्यात फारसं आकर्षण वाटलं नाही. त्यांचा ओढा नृत्याकडे होता. त्यामुळे पूर्ण वेळ नृत्य करायचं ठरवलं. योगायोगाने त्या सातवी-आठवीत असताना मुंबई विद्यापीठाशी संलग्न नालंदा डान्स कॉलेज सुरू झालं. नृत्य शास्त्रातील डिग्री कोर्स सुरू झाला. त्यात करिअर करायची असं ठरवल्यामुळे युनिव्हर्सिटीचा बी एस ए.. बॅचलरऑफ फाइन आर्ट्स हा डिग्री कोर्स पूर्ण केला.

नृत्य प्रवास लवकर म्हणजे वयाच्या पाचव्या वर्षी सुरु झाल्यामुळे तेजुताईंचे आरंगेत्रम वयाच्या अकराव्या वर्षी झाले. त्यावेळी बाबूजी म्हणजे श्री सुधीर फडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते आणि सलग तीन तास खुर्चीला खिळून बसले होते. पंडित वेणुगोपाल पिल्लई यांचे गुरू आचार्य पार्वतीकुमार देखील त्यावेळी उपस्थित होते. ऋषितुल्य व्यक्तिमत्व. परफॉर्मन्स पाहून ते इतके प्रभावित झाले की त्यांनीही तेजुताईंना नृत्य शिकवण्याची तयारी दर्शवली. त्यानंतर तेजुताईंचं त्यांच्याकडेही भरतनाट्यम प्रशिक्षण सुरू झालं. ते गुरुजींच्या मृत्यूपर्यंत चालू राहिलं. तेजुताई कृतज्ञतेने म्हणतात, मी खूप भाग्यवान. मला अत्युत्कृष्ट गुरु लाभले.

शाळेचं दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आचार्य पार्वतीकुमार यांनी सांगितलं, तुझं नृत्य शिक्षण पूर्ण झालं आहे. आता तू शिकवायला सुरुवात कर. आता जे शिकायचं ते शिकवण्याच्या प्रक्रियेतून. तेजुताईंना शिकवण्यात ही मजा यायला लागली. त्या म्हणतात, आमच्या तंजावूर नृत्यशाळेचा मोटो आम्ही ठेवला आहे विद्यार्जनमं विद्यादानमं ध्येयं त्वं निरंतरं. मी माझ्या शिष्यांना ही हेच सांगत असते, सतत विद्यादानाच्या मार्गाने विद्यार्जन करा. तुमचा प्रत्येक विद्यार्थी तुम्हाला नकळत काहीतरी शिकवत असतो.



वयाच्या विसाव्या वर्षी स्वत:चे क्लासेस सुरू केले, त्याच महिन्यात सचिन शंकर बॅले ग्रुपची पेपर मध्ये जाहिरात आली. एक वेगळा दृष्टिकोन मिळावा यासाठी सचिन दादांकडे इंटरव्ह्युला गेल्या. दादांचं व्यक्तिमत्त्व भारावून टाकणारं होतं. त्यांनाही तेजुताईंमधील शिस्तशीरपणा वगैरे गुण भावले असावेत. त्यामुळे पहिल्या दिवसापासून नाळ जुळली आणि तीन-चार महिन्यात तेजुताई त्यांच्या नृत्यनाटिकेमधील मुख्य स्त्री भूमिका करू लागल्या. खूप वर्ष त्यांच्याबरोबर काम केलं. केवळ नृत्यातीलच नव्हे, तर संपूर्ण ग्रुपला सांभाळणे, कोरिओग्राफी, स्टेजची व्यवस्था, वगैरे या क्षेत्रातील व्यावसायिक बारकावेही त्या शिकल्या.

श्री प्रकाश यांचे लेले कुटुंबीय आणि शेवडे कुटुंबीय यांच्यात घट्ट मैत्रीचं नातं होतं. अगदी बालवयापासून असलेल्या मैत्रीचं अगदी सहजच विवाहात रूपांतर झालं. आय आय टी बनारस विद्यापीठाचे केमिकल इंजिनिअर असलेले श्री प्रकाश यांनी पत्नीला संपूर्ण सहकार्य केले त्यामुळेच पुढे ग्रीष्मा व शिशिरा या मुलींच्या जन्मानंतरही सचिन शंकर बॅले ग्रुपमधील आपला सहभाग त्यांना पुढे चालू ठेवता आला, तसेच त्यांचे क्लासही सुरळीत चालू राहिले. तेजुताईनी देशापरदेशात भरपूर शोज केले. चौदा-पंधरा वर्षांची झाल्यावर ग्रीष्मा क्लासमध्ये तसेच व्यावसायिक प्रयोगातही त्यांना जॉईन झाली. श्रीमती लक्ष्मी मामी यांच्या कडून वयाच्या चौथ्या वर्षापासून ती कर्नाटकी संगीत शिकत



आहे आईच्या बरोबरीने नृत्याबरोबर संगीताची बाजूही सांभाळते आहे. धाकटी मुलगी शिशिरा सीए आहे. वेळ असेल तेव्हा तीही या दोघींना जॉईन होते. तेजूताई मजेत आमची मदर - डॉटर टीम म्हणतात. त्यांनी आजवर वीस पंचवीस जणांचे ग्रुप्स घेऊन ही खूप शोज केले आहेत. भरतनाट्यम् ही मंदिरातील कला आहे. दक्षिणेतील मंदिरांमध्ये कला सादर करणं हा वेगळा अनुभव असतो. आजपर्यंत इटली, स्पेन, बल्गेरिया अशा अनेक ठिकाणी त्या ग्रुप घेऊन गेल्या आहेत. तसेच वेगवेगळे पुरस्कार मिळवले आहेत. जसं इटली येथील प्रिझर्वेशन ऑफ कल्चर अवॉर्ड.

कोविडमुळे लॉकडाऊन जाहीर झाला तेव्हा सुरुवातीला सारं जग सुन्न झालं होतं. परंतु तेजुताई व ग्रीष्मा यांना तसा प्रश्न आला नाही कारण त्याआधीच म्हणजे सोळा मार्च पासूनच ऑनलाइनचा पर्याय निवडून त्याप्रमाणे क्लास चालू केले होते. दूरदृष्टीने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे क्लासमध्ये काहीच खंड पडला नाही. शिवाय दुसऱ्या शहरात किंवा परदेशात राहायला गेलेल्या मुलीही पुन्हा जॉईन झाल्या. त्यांच्याकडे दसऱ्याचा प्रोग्राम महत्त्वाचा असतो. तो देखील ऑनलाईन केला. अलीकडे सहा महिने हायब्रीड मॉडेलचा अवलंब केला आहे. साधारण दहा-बारा मुली एका बॅचला असतात त्यापैकी एका वेळी तीन ऑफलाइन आणि बाकी त्याच वेळी ऑनलाइन येतात आणि हे बाय रोटेशन. प्रत्यक्ष सहवासामुळे मुलींशी छान बॉण्डिंग जुळतं त्याचा उपयोग पुढे अभिनयातून चांगलं काम करून घेताना होतो.

काही वर्षांपूर्वी त्यांना मणक्याचं दुखणं जडलं होतं पण सात-आठ महिन्यांच्या ब्रेकनंतर त्यातून त्या बाहेर पडल्या. चार वर्षांपूर्वी आयुष्याचा जोडीदार साथ सोडून गेला तेव्हा काही काळ स्टेजपासून त्या दूर राहिल्या. पण कलेनेच त्यांना सावरलं. पुढे जायचं बळ दिलं. त्या म्हणतात, स्टेजवर सतत वावरल्यामुळे अडचणी या येणारच आणि त्यावरून मात करून पुढे जायचं आहे ही मनाची तयारी झालेली असते. The show must go on.

पंचेचाळीस वर्षांच्या कारकिर्दीत आजपर्यंत किती मुली अंदाजे शिकून गेल्या असतील? असं विचारताच त्या म्हणतात, दोन हजारांवर नक्कीच!! आत्ताही सव्वा दीडशे मुली त्यांच्याकडे नृत्य शिकत आहेत. कारकिर्दीतील एक हृदयस्पर्शी अनुभव सांगताना त्या म्हणतात, आमच्याकडे आजपर्यंत कितीतरी माय लेकींच्या जोड्या शिकून गेल्या आहेत. पण माझं साठावं आरंगेत्रम् उल्लेखनीय असं होतं. आई आधी माझी शिष्या होती. लग्नानंतर काही काळ नृत्यापासून दूर राहिली. मुलगी फिजिकली चॅलेंज्ड होती. तरीही तिला जिद्दीने तेजुताईंकडे घेऊन आली. स्वत:ही नृत्य सुरू केलं आणि दोघींनीही आरंगेत्रम केलं. हृदयस्पर्शी असा तो क्षण होता. सर्वांनी दोन्ही माय - लेक जोडीच खूप कौतुक केलं.


पुढे काय असं विचारल्यावर तेजुताई हसतात आणि म्हणतात इतकी वर्ष नृत्य केलं आता या पुढे अजून काय वेगळं करणार? तेजुताई, तुम्हाला पुढच्या वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२




Call : 91 8097900180 / 181
For Orders
zomato
SWIGGY
Let your taste buds enjoy the flavours of the grill.
सुमॅक
बिर्याणी अॅन्ड
कबाब हाऊस
Sumac
Biryani and Kabab House
We specialise in Charcoal and Tandoor dishes like Assorted
Biryanis and Kababs. Enjoy our Signature Dishes
Food preparation : Our food is prepared in pure Sunflower Oil
Email : Sumaccuisine01@gmail.com
55, PRABHAT COTTAGE , HANUMAN ROAD, VILE PARLE (E), MUMBAI - 57


पार्ले
BAZAAR
www.parlebazaar.com
Vile Parle's Own Business Platform
ANY BUSINESS, PROFESSION
Advertise , Get Listed on
www.parlebazaar.com
& Reach Parlekars @ Click !
A Joint Venture of: पार्लेकर Townपार्ले
FOR DETAILS CONTACT:
9769261182 / 8169825961 / 8104286202
email: parlebazaar1@gmail.com


HAPPY
Diwali
Let this Diwali bring all the Shine
and Sparkle to your Business with
Parle Bazaar
पार्ले
BAZAAR
www.parlebazaar.com
Vile Parle's Own Business Platform
9769261182 , 8169825961,
8369438828
parlebazaar1@gmail.com

# ला पाझ

देशोदेशी

ला पाझ अक्षरश: आकाशात वसलेलं शहर आहे कारण बोलीव्हियाची ही राजधानी समुद्रसपाटीपासून सरासरी ३७०० मीटर (सुमारे १२००० फूट) उंचीवर आहे. चारी बाजूंना आकाशाला भिडलेल्या डोंगरांच्या मधील वर्तुळाकृती वाडग्याच्या उतरत्या भिंतींवर बांधलेलं हे शहर दृष्टीला पडलं तेंव्हा पहिली प्रतिमा माझ्या मनात उभी राहिली ती सर्कशीतल्या मृत्युगोलाची. त्यातला तो शूरवीर फटफटीचालक कसा, वर्तुळाकार फिरत फिरत मृत्युगोलाच्या तळापासून वरपर्यंत जातो, ला पाझ मधली वाहनाची रहदारी सुद्धा त्या वाडग्याच्या वरच्या काठावरून पाहिलं तर तशीच दिसते.

माउंट इलिमानी ह्या २१००० फूट उंच शिखराच्या कुशीतील हा प्रदेश प्रागैतिहासिक काळात एका ग्लेशियरने (हिमनदी) व्यापलेला होता. कालौघात लुप्त होता होता ह्या हिमनदीने सभोवतालचे पर्वत कातून काढून बनवलेल्या खिंडीत ला पाझ वसलेलं आहे. ह्या कातकामातून निर्माण झालेल्या कडे-कपारींचे विलक्षण आकार शहराच्या सभोवताली आजही दिसतात ( **पहिले ३ फोटो** - १, - इलिमानीच्या छायेतलं ला पाझ, २, ३ - एखाद्या परग्रहावरचं भासावं असं शहराच्या सीमेवरच्या 'Moon Valley“ मधलं दृश्य). ला पाझच्या वाडग्यासारख्या रचनेमुळे, शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जायचं असेल तर सरळ रेषेत दिसणाऱ्या अंतराच्या तिप्पट प्रवास करावा लागतो - एक तर वाडग्याच्या काठावरून गोलाकार फिरून किंवा वाडग्याच्या काठापासून तळापर्यंत आणि परत तळातून समोरच्या काठापर्यंत. त्यामुळेच आकाशातच वसलेल्या ह्या शहरातील सार्वजनिक वाहतूक ही मुख्यत: बस किंवा ट्रेन ऐवजी आकाशातूनच जाणाऱ्या रोप-वे ने होते. रोप-वे चं हे जाळं कोळ्याच्या जाळ्यासारखं चहूदिशांना पसरलेलं आहे **(चौथा फोटो)**.

आजचा बोलिव्हिया जेंव्हा स्पॅनिश साम्राज्याची वसाहत होता तेंव्हा त्याला अप्पर (म्हणजे उत्तरेचा नव्हे तर अक्षरश: 'उंचावरचा") पेरू असंच म्हणत. त्याचं बोलिव्हिया हे नाव ज्या सिमोन बोलीवार वरून ठेवण्यात आले तो संपूर्ण इतिहासातील कदाचित असा एकमेव माणूस असेल जो एकाच वेळी ६ वेगवेगळ्या स्वतंत्र राष्ट्रांचा निर्वाचित राष्ट्राध्यक्ष होता. परंतु बोलिव्हियाच्या स्वातंत्र्यसंग्रामाची सुरुवात बोलीवारच्याही आधी अपोलीनार हायेन आणि डॉन पेद्रो डॉमिंगो मुरीयो ह्यांनी पुकारलेल्या बंडा पासून झाली होती. दोघांचाही जन्म खानदानी सरदार कुळातील, दोघांचेही वाडे ला पाझ मध्ये एकाच रस्त्यात (काब्रा कांचा). ह्या रस्त्याला बोलिव्हियाच्या स्वातंत्र्यलढ्यात अनन्यसाधारण स्थान आहे. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात बोलिव्हियात झालेल्या जनजागृतीची सुरुवात ह्याच रस्त्यापासून झाली. येथील आजही दिसणारे साधेसुधे कॅफे, गुत्ते आणि उपाहारगृहं ही स्वत्वाची जाणीव झालेल्या देशभक्तांची गुपचूप भेटण्याची आणि त्यांना वेळप्रसंगी आसरा देणारी ठिकाणं होती. लढ्याच्या पहिल्या योजना इथेच आखल्या गेल्या. स्पेनच्या राजसत्तेला आव्हान देणाऱ्या घोषणा इथेच पहिल्याने पुकारल्या गेल्या. डॉन मुरीयो आणि हायेन दोघांनाही मात्र त्यांनी पुकारलेल्या ह्या बंडाबद्दल फाशी देण्यात आलं आणि त्यांच्या अनुयायांची निर्घृण कत्तल करण्यात आली.

ला पाझ मधील सर्वात महत्वाचा चौक आज डॉन मुरियो प्लाझा नावाने ओळखला जातो **(पाचवा फोटो)** आणि काब्रा कांचा रस्त्याला काय्ये अपोलिनार हायेन असं नाव देण्यात आलं आहे. अजूनही हा रस्ता आपलं अठराव्या शतकातील रूप टिकवून आहे. पदपथावरील तसेच कॅफे, तीच जुन्या स्पॅनिश शैलीची रंगीबेरंगी घरे, तसाच फरसबंदी रस्ता - त्यावरून चालताना आपल्याला चटकन भूतकाळात घेऊन जातात **(फोटो क्र. ६,७)** . आज हा रस्ता ला पाझ मधील उभरत्या कलाकारांचं केंद्रस्थान आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला छोट्या छोट्या स्टुडिओमधील कलेच्या प्रांतातील तरुण मुशाफिरांची प्रदर्शनं, आपल्याला साल्वादोर दाली आणि पिकासोच्या काळातील पॅरिसमधील मॉंमार्त्र ची आठवण करून देतात. रस्त्यातील हायेन आणि मुरीयो ह्यांच्या मूळ वाड्यांचे आज त्यांच्या आठवणीसाठी म्युझियम मध्ये रूपांतर करण्यात आले आहे.

ला पाझच्या रस्त्यांतून भटकणे हा त्यातील वैविध्यांमुळे (एकीकडे चेटक्यांची गल्ली, दुसरीकडे कार्निवाल साठी वापरायचे चित्रविचित्र पोशाख विकण्याचा बाजार, तिसरीकडे 'Moon Valley'चे विलक्षण दृश्य) जितका मनोरंजक तितकाच दमछाक करणारा अनुभव आहे. समुद्र सपाटी पासून १२५०० फूट उंचावरील रस्त्यातून फिरताना जेंव्हा एकदम २०० पायऱ्या चढून जायचा प्रसंग येतो तेंव्हा आपल्या वयाच्या मानाने 'आपण किती fit आहोत' ह्याबद्दलचे गोड गैरसमज चटकन विरून जातात. पण ला पाझ पेक्षाही अधिक विलक्षण अश्या बोलिव्हियातील दोन ठिकाणी आपण पुढच्या

**सतीश जोशी**
९८२०२२८२७९




















## विलेपार्ले महिला संघ ग्रंथालय व कु. कृष्णाबाई लिमये वाचनालय

'मंगलायतन', परांजपे 'बी' स्कीम रोड नं. १, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.
दूरध्वनी : ०२२ - २६१६ ९३ ८९ / २६१६ ९२ ७२

आयोजित

### निबंध स्पर्धा - २०२१ (वर्ष ८ वे)


**निबंध स्पर्धेचे विषय :**

**१) लॉकडाऊन आणि मी**
**२) निसर्गाचे रौद्ररुप**
**३) खेलो इंडिया खेलो**

निबंध स्पर्धेचे नियम :

१) निबंध स्पर्धेमध्ये १८ वर्षे पूर्ण झालेली कुठलीही व्यक्ती भाग घेऊ शकते.
२) निबंध मराठी भाषेत लिहिलेला असावा.
३) एका व्यक्तीला स्पर्धेसाठी एकच निबंध पाठवता येईल.
४) स्पर्धकाने आपले नांव, पत्ता, फोन नं. इत्यादी माहिती एका वेगळ्या कागदावर लिहून फुलस्केपला जोडावे. सदर माहिती निबंध लिहिलेल्या फुलस्केपवर लिहू नये, अन्यथा असा निबंध स्वीकारला जाणार नाही.
५) निबंधाची शब्दमर्यादा जास्तीतजास्त ६०० शब्द आहे.
६) निबंध पाठपोट लिहू नये.
७) निबंध सुवाच्य अक्षरात लिहिलेला असावा किंवा प्रिंट करून पाठवणे.
८) निबंध ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत विलेपार्ले महिला संघ ग्रंथालयात सकाळी ९ ते संध्या. ६ यावेळेत आणून द्यावेत. (रविवार व सुट्टीचे दिवस सोडून)
९) इतरत्र प्रकाशित झालेला मजकूर निबंधामध्ये आढळल्यास तो निबंध ग्राह्य धरला जाणार नाही.
१०) निबंधस्पर्धेमध्ये कुठलेही कारण न देता निबंध नाकारण्याचा अधिकार ग्रंथालयाला आहे. तसेच निबंध स्पर्धेचा निकाल सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील.

डॉ. मिलिंद न.जोशी लिखित आणि थिन्कमराठी.कॉम पब्लिकेशन प्रकाशित पुस्तक.




" 'आगळं-वेगळं' हे पुस्तक म्हणजे १५ पर्यटनयोग्य स्थळांच्या वर्णनाचा गुलदस्ता आहे. यातील काही ठिकाणं मुंबई पुण्याजवळची, काही आपल्या देशातील तर काही विदेशातीलही. काहींची नावं आपण ऐकलेली, काहींची नव्याने ठाऊक होणारीही, त्यामुळे पुस्तकाचं आगळं वेगळं' हे वेगळ्या घाटणीचं नाव समर्पक ठरतं .प्रवासाची आवड प्रत्येकालाच असते असं नाही. पण हे पुस्तक वाचल्यावर ती आवड जागी व्हावी असं चैतन्य या पुस्तकात नक्की आहे."

- प्रस्तावनेतून

लेखक - डॉ.मिलिंद न. जोशी  प्रकाशक - थिन्कमराठी.कॉम पब्लिकेशन Thinkमराठी.com

हे पुस्तक इ-बुक आणि प्रिंट या दोनही स्वरूपात उपलब्ध होणार आहे.
प्रिंट पुस्तकाची किंमत २००/- आहे आणि गुगल इ-बुक ची किंमत १६५.२० /- रुपये इतकी आहे.

प्रिंट पुस्तकाचे प्रीबुकिंग करायचे असल्यास येथे दिलेल्या नंबर वर आपण संपर्क साधू शकता.
चंदा मंत्री - ९७६९२६११८२ / ८१६९८२५९६१ | डॉ.मिलिंद न. जोशी - ९८९२०७६०३१

इ-पुस्तक घ्यायचे असल्यास खालील लिंक वर क्लीक करून आपण पुस्तक विकत घेऊ शकता , हे पुस्तक आपणास मोबाइल, टॅब , लॅपटॉप , डेस्कटॉप अशा कोणत्याही माध्यमवरून वाचता येईल.
https://www.thinkmarathi.com/aagalvegalapustak/


# 'स्पर्श-संवेदनेचं रहस्य'

आजकालच्या भाषेत सांगायचं तर, आपली ज्ञानेंद्रिये ही निसर्गाने बहाल केलेले उत्कृष्ट 'सेन्सर्स' आहेत. ती बनवताना निसर्गाने, आपल्या भवतालचे पदार्थ किंवा ऊर्जाप्रकार आपल्याला नीट समजावेत, अशा प्रकारे ही ज्ञानेंद्रिये 'डिझाईन' केली आहेत. आपल्या सभोवतालच्या प्रकाशाची संवेदना होण्यासाठी बनवलेल्या डोळ्यांमध्ये 'फोटोसेल' आहेत; आवाजाची संवेदना होण्यासाठी यांत्रिक ऊर्जा शोषणारं कर्णयंत्र आहे; भवतालच्या वातावरणात किंवा आपल्या खाण्यात येणारी, बरी-वाईट रसायनं समजण्यासाठी घ्राणेंद्रिय आणि जिव्हा आहे. परंतु ह्या सर्वांपेक्षा विविध आणि जटील संवेदना जाणण्याचं काम करते ते आपलं स्पर्शेंद्रिय- त्वचा! त्वचेच्या संवेदनांमुळे आपल्याला स्पर्शज्ञान होतं, असं आपण लहानपणापासून शिकलेलं असतो खरं; परंतु 'स्पर्श' म्हणजे नक्की काय, ह्याचा विचार बहुधा पूर्णपणे केलेला नसतो! नुकत्याच जन्मलेल्या बाळाच्या गालाचा लोण्यासारखा मऊशार स्पर्श; सुपात बुडवलेल्या चमच्यांचा जिभेला होणारा 'स्स स्स!' करायला लावणारा गरम-गरम स्पर्श;



नवीनच नेसलेल्या साडीचा अंगाला होणारा रेशमी स्पर्श, डॉक्टरच्या इंजेक्शनच्या सुईचा टोकदार स्पर्श, लोकल ट्रेनमधून उतरताना दरवाजात झालेल्या धक्काबुक्कीचा दांडगट स्पर्श.... आणि कपाळावर तळहात उलटा ठेवून तापाचा अंदाज घेणारा आणि गाढ झोपेत असताना केसातून फिरणारा, आईच्या हाताचा मायेचा स्पर्श! स्पर्शाचे अनेक प्रकार आपल्याला पाहायला मिळतात. अगदी कोण्या प्रेमवेड्या कवीने म्हटल्याप्रमाणे 'तो स्पर्श काय तुजला सांगून काय गेला, गालावरी तुझ्या का खुलवून लाज गेला!' असा हळुवार जादुई स्पर्श सुद्धा असतो! तर हे सारे स्पर्श आपल्या मेंदूला समजतात ते आपल्या स्पर्शेन्द्रियामधल्या सेन्सर्समुळे!

शास्त्रीय भाषेत विचार केला तर ह्या स्पर्शात कधी बाहेरच्या हवेच्या किंवा वस्तूच्या तापमानाचं मोजमाप असतं; कधी टोचण्यामुळे अचानक सुरु झालेला विद्युतप्रवाह असतो; कधी अंतस्त्वचेवर पडलेल्या दाबाचं मोजमाप असतं; तर कधी वस्तूच्या मऊ किंवा खरखरीत पृष्ठभागामुळे निर्माण झालेले यांत्रिक दाब असतात. स्पर्शेन्द्रियाच्या ह्या वैविध्यामुळे स्पर्शाचं कार्य नक्की कसं चालतं, हा शास्त्रज्ञांच्याही दृष्टीने मोठं गूढ राहिलं आहे!



खरं तर 'गूढ राहिलं होतं' असं म्हणायला पाहिजे! कारण ह्या गूढाचा अनेक दशकं मागोवा घेऊन, त्यातील भौतिकविज्ञान आणि जीवरसायनाचा शोध घेणाऱ्या दोघा अमेरिकन शास्त्रज्ञाना, ह्या वर्षीचा वैद्यकशास्त्राचा नोबेल पुरस्कार, चार ऑक्टोबर २०२१ रोजी जाहीर झाला, आणि हे रहस्य उकललल्याचं जगाला समजलं. हे दोघे शास्त्रज्ञ म्हणजे युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, सॅनफ्रांसिस्कोचे डॉ.डेव्हिड जुलियस आणि 'लाहोला' कॅलिफोर्नियाच्या सुप्रसिद्ध स्क्रिप्स इंस्टिट्यूटमधले प्रो. आरडेम पाटापौशिन. हजारो वर्षे न सुटलेल्या ह्या जीव-भौतिकी कोड्याचा



ध्यास घेऊन ह्या नोबेल विजेत्यांनी क्षणोक्षणी वापरात येणाऱ्या ह्या मूलभूत कोड्याची उकल करून मनुष्यजातीपुढे नव्या शोधांची दालनं उघडून दिली आहेत. ह्या शोधांमुळे स्पर्शज्ञानाची मूलभूत प्रक्रिया तर समजली आहेच; शिवाय स्पर्श-संवेदना न होण्याचे किंवा कमी होण्याचे जनुकीय विकार, सूज आल्यावर कमी होणारी स्पर्श-संवेदना त्वचेचं पुन:-रोपण, काही कारणामुळे अति-संवेदनाशील होणारे वेदनाकारी स्पर्श, अशा अनेक औषधी नसलेल्या विकारांसाठी हे मूलभूत ज्ञान म्हणजे मोठी देणगी आहे! सध्याच्या कोरोनाच्या आव्हानामुळे आवश्यक झालेल्या दूरस्थ कारभारासाठी तर हे ज्ञान म्हणजे नव्या जीव-वैद्यकीय उपकरणं बनवण्याची मोठीच सुसंधी ठरण्याची शक्यता आहे!

स्पर्श-संवेदनेसारख्या सध्या प्रक्रियेमागे किती मोठं विज्ञान दडलं आहे, हे समजलं तर ह्या शोधासाठी इतका उशीर का लागला हे समजून घेता येईल. सतराव्या शतकातला प्रसिद्ध तत्ववेत्ता रेने देकार्त ह्याने पहिल्यांदा असं मत मांडलं



की शरीरात सर्वत्र त्वचेपासून निघून मेंदूपर्यंत पसरलेल्या तारा आहेत. ह्या तारांमुळे संवेदना यांत्रिक शक्तीने त्वचेपासून मेंदूपर्यंत जातात. अर्थात 'तारा' म्हणजेच 'नसा' म्हणजे मज्जातंतू हे त्याला समजलं नाही. पण त्यामुळे, त्वचेत 'संवेदनाकेंद्र' असतात, ही कल्पना प्रस्थापित झाली. त्यानंतर एकोणीसशे चव्वेचाळीस मध्ये जोसेफ एरलंजर आणि हर्बर्ट गॅसर ह्यांनी त्वचेतील ही संवेदनाकेंद्र सर्व सारखी नसून वेगवेगळ्या प्रकारची असतात, असा शोध लावला. त्यांच्या संशोधनामुळे एवढं समजलं की काही केंद्र तापमान मोजतात; त्यातही हवीहवीशी वाटणारी उब आणि भिजणारी उष्णता ह्यातील फरक ओळखण्याची क्षमता असते; हात पिळल्यावर होणारी वेदना आणि वाऱ्याच्या झुळुकेचा कोमल स्पर्श वळणारी केंद्र वेगळी असतात अर्थात अनेकविधी प्रकारची संवेदना केंद्र असू शकतात. ही माहिती महत्वाची होती. संवेदनेचा संदेश वाहून नेणारे मज्जातंतू आणि स्नायूंना क्रिया करायला लावणारा संदेश मेंदूकडून आणणारे मज्जातंतू आणि ते कार्य पूर्ण झाल्याचा निरोप परत मेंदूपर्यंत पाठवणारे मज्जातंतू वेगळे असतात, हे समजलं. पण पुढचं पाऊण शतक हा स्पर्शाचा संदेश मूलत: तयार होतोच कसा', हे समजलं नव्हतं!

ह्या प्रश्नाचा पहिला शोध घेतला तो डेविड जुलियसने. त्याने तापमान मोजणाऱ्या संवेदनाकेंद्रांचा शोध घेतला. साधारणत: असं तापमानमापन, 'थर्मोकपल' ह्या तंत्राने होतं. थर्मोकपलमध्ये सेमी-कंडक्टर प्रकारची मूलद्रव्ये वापरली जातात; दोन वेगळ्या प्रकारच्या धातूचे दोन जोड बनवून, एक जोड गरम आणि दुसरा जोड थंड ठेवला, तर त्यात विद्युतप्रवाह सुरू होतो, हे वैज्ञानिकांना माहिती होतं. अशाच प्रकारचं काम त्वचेमधल्या, तापमान मोजणाऱ्या संवेदनकेंद्रांमध्ये होत असणार असा विचार ज्युलियसने केला; आणि बऱ्याच प्रयत्नानंतर त्याला त्वचेतील 'आयन-चॅनेल' उघड-बंद करणाऱ्या प्रथिनांचा शोध लागला. ही प्रथिनं कमी-अधिक तापमानानुसार आकार बदलतात आणि त्वचेमधील चॅनेल म्हणजे नळ्या उघडून 'आयन'चा प्रवाह आत-बाहेर जाऊ देतात. आयन हे विद्युत-भारितकण असल्यामुळे त्यांचं प्रमाण कमी-अधिक झालं की विद्युत-भार, म्हणजे व्होल्टेज तयार होतं; आणि मेंदूकडे संदेश पाठवणं शक्य होतं. ज्यूलियसच्या संशोधनामुळे आयन-चॅनेल प्रथिनांचं, तापमान संवेदनातलं कार्य समजलं. परंतु हे सिद्ध करण्यासाठी त्याने एका वेगळ्याच मार्गाचा वापर केला. मूलत: त्याला पडलेला प्रश्नही थोडा विचित्र होता. तो असा, की काहीवेळा गरम किंवा थंड पदार्थांचा स्पर्श न होताही आपल्याला गरम-गरम वाटतं, ते कसं काय? उदा. मिरची! मिरची काही 'गरम' म्हणजे अधिक तापमानाला नसते; पण मिरची चावली/ खाल्ली, किंवा मिरचीचा त्वचेला स्पर्श झाला, की तोंडाची किंवा त्वचेच्या ज्या भागाला मिरची लागलेली असेल, त्या भागाची जणू आग-आग होते. ह्या निरीक्षणावरून जुलियसने निष्कर्ष काढला, की मिरचीतील कोणत्या तरी रसायनामुळे त्वचेतल्या पेशीमध्ये होणारी प्रक्रिया आणि गरम/ थंड वस्तूच्या स्पर्शामुळे त्वचेतल्या संवेदनकेंद्रात होणारी प्रक्रिया ह्यात काहीतरी साधर्म्य असलं पाहिजे. ज्युलियसने ह्या दिशेने शोध सुरू केला. सर्वप्रथम त्याने त्वचेतल्या चेतापेशीमधून डीएनए बाहेर काढून त्याचे छोटे तुकडे केले; प्रत्येक तुकड्याची मिरची मधील 'कॅप्सायसिन' रेणूची प्रक्रिया करून त्यात काही बदल होतो की नाही हे तपासून पाहिलं. त्याच्या सुदैवाने 'डी.एन.ए' च्या एका तुकड्यामध्ये रेणूची प्रक्रिया होताना दिसली. मग डी.एन.एचा तो तुकडा त्याने असंवेदनाक्षम चेतापेशीत घालून तपासला. त्या असंवेदनक्षम चेतापेशीत आता 'कॅप्सायसिन'मुळे चॅनल उघडबंद करण्याची क्षमता आली होती! हाच जुलियसचा 'युरेका क्षण!'. त्याच्या हाती तापमान मोजणाऱ्या जिनचं रहस्यच मिळालं होतं!





प्रोफेसर आरडेम पाटापौशिनच लक्ष अशाच प्रकारच्या, पण जरा वेगळ्या प्रश्नाकडे होतं. प्रश्न खूपच महत्वाचा आणि जटील होता. तो असा: आपण डोळे बंद करून आपलंच नाक पकडायचा प्रयत्न केला, तर नाकाचा शेंडा पकडू शकतो! पोटरीला खाज आली, तर तेथे न पाहाताही हात नेमक्या ठिकाणी लावू शकतो. व्यायामासाठी हात लांब केले, तर विशिष्ट स्थितीपर्यंत ताण देण्याचं आपल्याला आपण होऊन समजतं. श्वसन करताना फुफ्फुसं कितपत फुगवत न्यायची, ते छातीच्या स्नायूंना आपसूकच समजतं. ही मर्यादा ओलांडली तर अधिक हवा घेत राहिल्यामुळे फुफ्फुसं फुटू शकतील; ताणलेल्या हाताचे स्नायू ताण सहन न होऊन तुटू शकतील; नेमक्या ठिकाणी पाहून सुद्धा खाजवत येणार नाही... नाकाच्या शेंड्याला, किंवा पाठीच्या बाजूला नेमका हात लावणं अशक्य होऊन बसेल.... ही मर्यादा शरीराला कशी काय समजते? जेवताना पोट भरून 'टम्म ' झाल्याची जाणीव कशी काय होते... असा जगावेगळा प्रश्न प्रोफेसर आरडेमला पडला होता. ह्या सर्व क्रियांमध्ये कुठेतरी पेशींवर पडणारा दाब म्हणजे प्रेशर मोजला जातो आहे हे त्याला समजत होतं; पण नेमकं कशामुळे हा प्रेशर समजतो, हे काही कोणी शोधलं नव्हतं! अरब जगातल्या अंतर्गत युद्धामुळे बेजार झालेल्या लेबनान देशातल्या कुटुंबातून अमेरिकेत शिक्षणासाठी



आलेल्या अरडेमला ह्या प्रश्नाने भारून टाकलं. भौतिक जगामध्ये असे दाब वापरून विद्युत प्रवाह बनवणारे 'पिझो-सेल्स' त्याने पहिले होते. साध्या गॅसच्या शेगडीच्या लायटरमध्ये पिझो-इलेक्ट्रिक परिणाम वापलेला त्याने पाहिला होताच. यंत्रांमध्ये प्रेशर मोजताना वापरले जाणारे पिझो-इलेक्ट्रिक सेन्सर्स त्याला माहित होते. अशाच पिझो-इलेक्ट्रिक पेशी शरीरात सर्वत्र असतात की काय ह्याचा त्याने पद्धतशीर शोध सुरू केला. प्रथम त्याने त्वचेमधील दाबाने ऍक्टिव्ह होणारे सेल वेगळे काढले. अशा सेलमधील बाहत्तर जनुकं वेगळी केली. नंतर एकेक जनुक बंद म्हणजे इनऍक्टिव्हेट करून त्याने त्यातल्या एखाद्या जनुकात पिझो-क्षमता आहे का ह्याची परीक्षा सुरू केली आणि प्रयत्नाला फळ मिळालच. बाहत्तरपैकी एक जनुक असं होतं, की त्याचं कार्य बंद केलं, तर त्या पेशींवर प्रेशरचा परिणाम होणं बंद होत होतं! म्हणजे याच जनुकात पिझो सेल चालू -बंद करण्याची जादू होती! हा आर्डेमचा 'युरेका क्षण!' कोणत्या जनुकात पिझो-परिणाम निर्माण करण्याची क्षमता आहे, हे त्याला समजलं होत!! इथे एका वाक्यात लिहिलेली ही माहिती शोधून काढायला अरडेम आणि त्याच्या टीमला पंधरा वर्ष लागली! आणि पंधरा वर्षाच्या सखोल संशोधनानंतर त्याला अशा दाबाचं/ प्रेशरचं रूपांतर विद्युतसंदेशांत करणाऱ्या जनुकांचा शोध लागलाच!

मानवजातीने हजारो वर्ष वापरलेल्या, ह्या गूढांची रहस्य ज्युलियस आणि अरडेम ह्या जोडगोळीला अशा अखंड अभ्यासानंतर मिळाली. हा अभ्यास वैद्यक, जीवशास्त्र, भौतिकी, रसायन, उपकरणांचं इंजिनीअरिंग ज्ञान आणि जनुकशास्त्र ह्या सर्वांच्या मिश्रणाचा, उघड्या डोळ्यांनी आणि कुतूहल जागं ठेवून केलेल्या प्रयोगांचा परिपाक होता! नोबेल पारितोषिक देणाऱ्या समितीने त्यांच्या ह्या मूलभूत शोधाचं महत्व जाणून वीसशे एकवीसंच वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाचं नोबेल पारितोषिक डेविड ज्युलियस आणि आर्डेम पाटापौशिन ह्यांना जाहीर केलं.

जीव-वैद्यकीय क्षेत्रात क्रांती होत असताना, दूरस्थ काम करण्यास मदत करणारी नवी नवी तंत्रज्ञानं शोधली जात असताना ज्युलियस आणि अरडेम ह्यांच्या शोधाच महत्व अधिकच वाढलं आहे. गेल्या शतकातील अनेक शोधांमुळे आपण दूरवरचे फोटो किंवा विडिओ घरबसल्या पाहू शकतो; दूर देशीचे आवाज त्याच क्षणी ऐकू शकतो. पण दूरवरच्या वस्तूला स्पर्श करण्याची, दैवी वाटेल अशी क्षमता आजवर शोधली गेली नाही, पण ज्युलियस आणि अरडेमच्या संशोधनामुळे तो दिवस दूर नाही, जेव्हा घरबसल्या आपण दूरवरच्या दुकानातील वस्तूला आपल्या हाताने स्पर्श करू शकू! किंवा भारतातल्या दूरवरच्या गावात बसलेली आई आपला मायेचा हात कॅलिफोर्निया नाहीतर शिकागोमध्ये असलेल्या आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या केसातून फिरवू शकेलं आणि दोघांना तोच खरा स्पर्श जाणवल्याचं समाधान मिळेल!




सद्गुरू कुळकर्णी
९७०२०१०४७१


DESTINY STAR'S
CRICKET ACADEMY
PRESENTS
SELECTION TRIALS FOR THE BOYS & GIRLS (UNDER.10 ,UNDER.12 ,UNDER.14)
DESTINY
STAR'S
SELECTION TRIALS FOR THE BOYS & GIRLS (UNDER.10 ,UNDER.12 ,UNDER.14)
THOSE STUDENTS WHO ARE SELECTED
THEY WILL GET FREE COACHING
REGISTRATION FEES FOR THE SELECTION TRIALS- 200/-
DATE:- 9-11-2021 & 11-11-2021 TIMINGS:-6:00 TO 8:00 PM
A SMALL BEGINNING WILL TAKE THEM A LONG WAY.
CHIEF MENTOR
MR.ANIL SADASHIV TALWANKAR
FOR MORE INFORMATION
JAY ANIL TALWANKAR.
(LEVEL 1 CRICKET COACH & FITNESS TRAINER)
JAY ANIL TALWANKAR.
98214 61026
VENUE-NAVA SAMAJ MANDAL MARG,DIXIT,CROSS ROAD NO.1 VILE PARLE (E) MUMBAI-400 057.


Maitra Adda
A fast food joint
maitra Adda
Order Now
BURGERS
Veg Patty
Spinach Corn
Herb Chilli
Spicy Paneer
SANDWICHES
Bambaiyya Veg
Veg. Jungli
Triple 'C'
Peri Peri Frites
Veg. Tandoori Mayo
Pesto Mushroom
IDLI
Steam Idli
Milgai Podi
Rajani
Au-gratin
Masala
Delivery
Take Away
To order: +91 8591752575
8A, DLH Dream Tower, Jai Bhavani Mata Road,
Amboli, Andheri (W), Mumbai - 400 058.


D SUGAR ARTISTRY
Cake Studio
You dream and we bake and
decorate it for you.
We at D Sugar Artistry create custom
cakes and we take professional cake
decorating workshop.
We specialise in Wedding cakes and
cakes for all occasion birthdays, anniversary
& more. Also we make petit French dessert -
Macarons and more...
We are known for our quality
ingredients, sugar flowers
and finessed decor.
Reach us at:
www.facebook.com/DSugarArtistry
www. Instagram.com/DSugarArtistry
Contact - 9769393731
D SUGAR ARTISTRY
Cake Studio
AALIYA 18
fssai Registered

# गाण्यांची मैफल




## मनोरंजन विश्व

सध्या ओटीटी प्लॅटफॉर्मची लोकप्रियता वाढत आहे . प्लॅनेट मराठीने सुद्धा आता प्रेक्षकांची मने जिंकली आहेत . प्लॅनेट मराठीला मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत आहे . यातच आता 'प्लॅनेट मराठी संगीत' हा नवीन विभाग 'प्लॅनेट मराठी ओटीटी'च्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या विभागात संगीतप्रेमींना पारंपरिक तसेच आधुनिक, चित्रपटातील आणि चित्रपटांव्यतिरिक्त, एक्सक्लुझिव्ह, नॉन-एक्सक्लुझिव्ह अशा विविध प्रकारांची गाणी ऐकायला मिळणार आहेत. प्लॅनेट मराठीची निर्मिती असलेल्या गाण्यांचाही आनंद संगीतप्रेमी घेऊ शकणार आहेत.

या विभागाअंतर्गत 'रिमझिम रिमझिम' हे गाणे नुकतेच प्रदर्शित झाले असून गाण्याचे बोल आणि संगीत आशिष विळेकर यांचे आहे तर प्रीती जोशी यांनी हे गायले आहे. 'प्लॅनेट मराठी संगीत' या विभागात कॅराओके, फोक स्टुडिओ, म्युझिक कॉन्सर्ट्स, सांगितिक मैफिलींचा श्रोत्यांना आनंद घेता येणार आहे. वैशिष्ट्य म्हणजे आधुनिकतेकडे वाटचाल करतानाच आपली परंपरा जपून ती सातासमुद्रापार नेण्याचा प्रयत्न 'प्लॅनेट मराठी' ओटीटी सुरुवातीपासूनच करत आहे. त्यामुळेच या संगीत विभागात प्रामुख्याने ओव्यांचाही सहभाग करण्यात आला आहे.येत्या काही दिवसात तब्बल २५ गाणी 'प्लॅनेट मराठी ओटीटी'वर उपलब्ध होणार असल्याने संगीतप्रेमींचे आता भरभरून मनोरंजन होणार हे नक्की.

प्लॅनेट मराठी संगीत' या विभागाबद्दल 'प्लॅनेट मराठी ओटीटी'चे प्रमुख, संस्थापक अक्षय बर्दापूरकर म्हणतात, ''प्रेक्षकांचे मनसोक्त मनोरंजन करणे हेच 'प्लॅनेट मराठी'चे ध्येय आहे.संगीत खजिना प्रेक्षकांसाठी घेऊन येत असतानाच त्यात आपली परंपरा असणाऱ्या ओव्यांचा आम्ही आवर्जून समावेश केला आहे. मराठी प्रेक्षक आशय निवडीच्या बाबतीत सुजाण असल्याने त्यांना उत्तम आशय देण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रेक्षकांना दिलेल्या वचनानुसार 'प्लॅनेट मराठी संगीत' हा नवीन विभाग लवकरच त्यांच्या भेटीला येणार आहे.'




# जय भवानी जय शिवाजी



स्टार प्रवाह वाहिनीवरील ' जय भवानी जय शिवाजी ' ही मालिका दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत आहे . छत्रपती शिवराय हे आपल्या सर्वांच्या मनातील आदराचे स्थान ! छत्रपती शिवरायांच्या स्वराज्याच्या स्थापनेच्या पूर्ततेसाठी हजारो शिलेदारांनी आपले प्राण पणाला लावले . याच शिलेदारांच्या शौर्याची गोष्ट सांगणाऱ्या 'जय भवानी जय शिवाजी' मालिकेत शिवा काशिद यांची शौर्यगाथा पाहायला मिळणार आहे. अभिनेता स्तवन शिंदे या मालिकेत शिवा काशिद यांची भूमिका साकारणार आहे .शिवा काशिद हे स्वराज्याच्या इतिहासातलं महत्त्वाचं पान. शिवरायांचा हा जिगरबाज मावळा हुबेहूब शिवरायांसारखा दिसायचा असं म्हटलं जातं. महाराजांची पन्हाळ गडावरुन सुटका करण्यासाठी शिवा काशिद यांनी छत्रपती शिवरायांचं सोंग घेऊन आपल्या राजाचा जीव वाचवला होता. याच जिगरबाज शिवा काशिद यांच्या शौर्याची गाथा साकारण्यासाठी अभिनेता स्तवन शिंदे सज्ज झाला आहे.स्टार प्रवाह वाहिनीवरच 'तुमचं आमचं सेम असतं ' आणि 'अग्निहोत्र २ ' या मालिकेत आपण स्तवनला पाहिले आहे . तो म्हणतो ,' या भूमिकेच्या निमित्ताने मी पुन्हा एकदा 'स्टार प्रवाह ' बरोबर जोडला जात आहे . मी लहानपणी घोडेस्वारी शिकलो आहे. त्यामुळे शिवा काशिद ही भूमिका साकारताना त्याचा नक्कीच उपयोग होईल. यासोबतच काही ऐतिहासिक पुस्तकांचं वाचनदेखील मी सध्या करत आहे. ' स्टार प्रवाह वाहिनीवर 'जय भवानी जय शिवाजी ' ही मालिका रात्री साडे दहा वाजता प्रसारित होते .

गणेश आचवल
९८२१२६८३९१